**माध्यम गोषवारा : ऑपरेशन ब्रह्मा (2000 वा., 01 एप्रिल 2025)**

01 एप्रिल 2025

भारताने 28 मार्च 2025 रोजीच्या विध्वंसक भूकंपानंतर म्यानमारला आवश्यक सहकार्यासाठी ‘ऑपरेशन ब्रह्मा’ हाती घेतले आहे. ज्यामध्ये शोध आणि बचाव कार्य (SAR), मानवतावादी सहाय्य, आपत्ती निवारण, वैद्यकीय मदत यांचा समावेश होतो. शेजारील देशांचा संकटकालीन पहिला प्रतिसादकर्ता म्हणून 'ऑपरेशन ब्रह्मा' हे भारताने म्यानमार मधील विध्वंसक भूकंपानंतर सहकार्यासाठी संपूर्ण शासन स्तरावरील उचललेले सक्रिय पाऊल आहे. आतापर्यंत, सहा विमाने आणि पाच भारतीय नौदलाच्या जहाजाच्या माध्यमातून 625 मेट्रिक टन मानवतावादी सहाय्य आणि आपत्ती दिलासा (HADR) साहित्य वितरित करण्यात आले आहे.

2. भारताच्या वतीने म्यानमारला NDRF आणि आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय यांद्वारे पुरविण्यात आलेल्या तंबू, ब्लँकेट्स आणि आवश्यक औषधे व खाद्यपदार्थ यांचा समावेश असलेली 15 टन वजनाची HADR साहित्याची पहिली तुकडी C-130J विमानाच्या सहाय्याने 29 मार्च 2025 रोजी सकाळी 07:30 वाजता यंगून येथे दाखल झाली.

3. भारतीय हवाई दलाच्या दोन C-130J विमानांच्या सहाय्याने दुसरी तुकडी रवाना करण्यात आली होती. ज्यामध्ये 80 NDRF शोध आणि बचाव कार्य (SAR) विशेषज्ज्ञ, उपकरणे आणि आपत्ती दिलासा साहित्य यांचा समावेश होता. एका विमानात 17 टन वजनाची वैयक्तिक संरक्षण उपकरणे, शोध आणि संपर्क, बचाव उपकरणे यांचा समावेश होता. दुसऱ्या विमानात 5 टन वजनाचे HADR साहित्य ज्यामध्ये जनित्रे संच, हायजिन किट्स आणि खाद्य पाकिटे, आवश्यक औषधे, किचन संच, ब्लँकेट्स इ. बाबींचा समावेश होता. ही विमाने 30 मार्च 2025 रोजी नेपिड्यॉ येथे दाखल झाली.

4. तिसऱ्या तुकडीत भारतीय हवाई दलाच्या दोन C-17 विमानांच्या सहाय्याने भारतीय सैन्याच्या 118 सदस्यांच्या फील्ड हॉस्पिटल टीम सहित 60 टन वजनाचे साहित्य, जलद उभारणी योग्य शस्त्रक्रिया आणि वैद्यकीय निवारा, जल निर्जंतुकीकरण आणि स्वच्छता सेवा आणि सर्वात महत्वपूर्ण महिला आणि बालक निगा सेवा यांचा पुरवठा करण्यात आला. हे विमान देखील 30 मार्च 2025 रोजी नेपिड्यॉ येथे दाखल झाले. रुग्णांवर उपचार आणि शस्त्रक्रिया करण्यासाठी 200 खाटांचे रुग्णालय मंडाले येथे कार्यरत झाले आहे.

5. भारतीय नौदलाच्या ईस्टर्न नेव्हल कमांडची सातपुडा आणि सावित्री ही जहाजे 40 टन HADR साहित्यासह 29 मार्च 2025 रोजी यंगून साठी रवाना झाली. हे मदत साहित्य 31 मार्च 2025 रोजी यंगूनच्या मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द करण्यात आली. भारतीय नौदलाच्या अंदमान आणि निकोबार कमांडची

कर्मुक आणि LCU 52 ही जहाजे अत्यावश्यक कपडे, पिण्याचे पाणी, खाद्यपदार्थ, औषधे आणि आपत्कालीन साहित्य यांचा समावेश असलेल्या HADR पॅलेट्स सह 30 वजनी टनांच्या मदत साहित्यासह 30 मार्च 2025 रोजी यंगून साठी रवाना झाली. हे मदत साहित्य 1 एप्रिल 2025 रोजी यंगून बंदरात सुपूर्द करण्यात आले.

6. आज 1 एप्रिल 2025 रोजी 'ऑपरेशन ब्रह्मा' पुढे सुरू ठेवण्यासाठी बाधित नागरिकांना तत्काळ मदत करण्यासाठी अत्यावश्यक साहित्य रवाना केले आहे. भारतीय हवाई दलाच्या C-130J विमानात अंदाजित 16 टन वजनाचे HADR साहित्य रवाना करण्यात आले. ज्यामध्ये तंबू, जनित्रे संच, पिण्याचे पाणी आणि आपत्कालीन औषधे यांचा समावेश असून मंडाले येथील बाधित नागरिकांना उपयुक्त ठरतील.

7. याशिवाय, 1 एप्रिल 2025 रोजी यंगून साठी भारतीय नौदलाचे जहाज घरियाल विशाखापट्टणम बंदरातून रवाना झाले. या जहाजाच्या माध्यमातून 405 मेट्रिक टन तांदूळ, 30 मेट्रिक टन खाद्यतेल, 5 मेट्रिक टन बिस्किट्स आणि 2 मेट्रिक टन इन्स्टंट नूडल्स सहित 442 मेट्रिक टन खाद्य मदतीचा समावेश होता. या मदत साहित्य पुरवठ्यामुळे बाधित म्यानमार नागरिकांच्या तत्काळ गरजेवर मार्ग काढण्यास मदत होईल.

8. मुलभूत गरजा आणि आवश्यकता यांच्या आधारावर भारत अधिक साहित्य सहाय्य आणि संसाधनांचा पुरवठा करण्यासाठी सज्ज आहे. ‘ऑपरेशन ब्रह्मा’ अंतर्गत भारताचे सध्या सुरू असलेले प्रयत्न आपल्या शेजारी देशांच्या नैसर्गिक आपत्तींना त्वरित आणि पूर्ण उपाययोजनेसाठी प्रतिसाद देण्याची वचनबद्धता दर्शवितात. पहिला प्रतिसादकर्ता म्हणून, भारत आपल्या 'नेबरहूड फर्स्ट' आणि 'अॅक्ट ईस्ट' धोरणाचा प्रमुख भागीदार म्हणून म्यानमार सोबत ठामपणे उभा आहे.

नवी दिल्ली

01 एप्रिल 2025